अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. अति.म.आ.(ज)/भा.७५/२५
दिनांक : ०७/०४/२०२१

## -: आदेश :-

विषय :- COEP जंबो कोविड हॉस्पिटल येथे समक्ष उपस्थित राहून सनियंत्रण करणेबाबत.

संदर्भ :- १. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
३. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे कार्यालय, विधानभवन, पुणे यांचे कार्यालयाकडील क्र. सा.प्र./आस्था/कोविड-१९/१०४८/२०२० दि.०३/०४/२०२० चे पत्र.

पुणे शहरातील कोरोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेमार्फत COEP जंबो कोविड हॉस्पिटलची निर्मिती करण्यात आली आहे. सदर ठिकाणी कोविड रुग्णांची संख्या वाढत असल्याने रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांवर त्वरित आवश्यक ते उपचार होण्यासाठी व रुग्णालयातील सर्व कामकाज, नियुक्त संबंधित यंत्रणा यांचे कामांवर देखरेख, नियंत्रण व समन्वय साधून जम्बो रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी व सर्व यंत्रणांच्या कामकाजाचे सनियंत्रण व दैनंदिन व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी श्री. नितीन उदास, उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०२, पुणे महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती पुढील आदेश होईपर्यंत नियुक्त करण्यात येत आहे.

श्री. नितीन उदास, अध्यक्ष, तथा उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०२ कार्यालय यांनी दररोज सकाळी COEP जंबो कोविड हॉस्पिटल येथे भेट देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घ्यावा. तसेच यावेळी त्यांनी ऑक्सिजन पुरवठा, स्वच्छता, बायो मेडिकल वेस्टची विल्हेवाट लावण्याचे नियोजन, भोजन व्यवस्था हॉस्पिटल मधील इतर कर्मचारी यांचे एकत्रीत नियोजन व सनियंत्रण करावयाचे आहे.

तरी, खालील नमूद अधिकाऱ्यांनी सदर जंबो रुग्णालयात उपस्थित राहून उपरोक्त जबाबदारी पुढील आदेश होईपर्यंत पार पडावयाचे आहे.

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन उदास<br>उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०२<br>पुणे महानगरपालिका | अध्यक्ष |
| २. | श्रीमती आशा राउत<br>महापालिका सहाय्यक आयुक्त,<br>शिवाजीनगर – घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय<br>पुणे महानगरपालिका | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री. श्रीधर कामत<br>कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,<br>पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ४. | श्री. अभिजित साठे,<br>प्र. कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग,<br>पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ५. | श्री. श्रीधर येवलेकर<br>कार्यकारी अभियंता,<br>मलनि:स्सारण व देखभाल दुरुस्ती विभाग<br>पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ६. | डॉ. वैशाली तळपे,<br>वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग,<br>पुणे महानगरपालिका | सदस्या सचिव |

Rubal 1/4/21

(रुबल अग्रवाल)

अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)

पुणे महानगरपालिका

प्रत: -

संबंधित खातेप्रमुख / कर्मचारी,

पुणे महानगरपालिका

यांना पुढील कार्यावाहीस्तव....